॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. १६ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### मालगाडीचे ६ डबे रुळावरून घसरले

● **जळगाव** – जळगाव जिल्ह्यातील अमळनेर स्थानकाजवळ आज मालगाडी रेल्वे रुळावरुन घसरली. या दुर्घटनेत मालगाडीचे जवळपास ५ ते ६ डबे रुळावर अस्ताव्यस्त झाले. धक्कादायक बाब म्हणजे या दुर्घटनेवेळी एखादी रेल्वे समोरून आली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. कारण मालगाडीच्या अपघातात आजूबाजूच्या रेल्वे रुळाचेही नुकसान झाले आहे. भुसावळहून नंदूरबारच्या दिशेला मालगाडी जात होती. या दरम्यान अमळनेर स्थानकाजवळ मालगाडीचे पाच ते सहा डबे रेल्वे रुळावरून खाली घसरले. या अपघातामुळे सुरत–भुसावळ रेल्वे वाहतूक ठप्प झाली. या अपघातात सुदैवाने लोको पायलट आणि गार्ड सुरक्षितपणे बचावले आहेत. संबंधित घटना ही आज दुपारी दोनच्या सुमारास घडली. अपघाताचे वृत्त समजताच रेल्वे अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

### स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी फेर प्रभाग रचना करा

● **मुंबई** – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घ्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिले होते. त्यानंतर आता राज्य निवडणूक आयोग सक्रिय झाले आहे. त्याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगान सरकारला महत्वाचे आदेश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा असे निर्देश सरकारला देण्यात आला आहेत. ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्वाचे निर्देश दिले होते. 'चार महिन्यांच्या आत रखडलेल्या निवडणुका घ्या' असे सुप्रीम कोर्टाने सांगितले होते. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ठराविक वेळेत घ्या. उर्वरित वादाचे मुद्दे टाळा असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले होते. कोर्टाच्या या आदेशानंतरच आता राज्य निवडणूक आयोग या निवडणुका घेण्यासाठी सक्रिय झाला आहे.

# भारताचा तुर्कीस्तानला दणका

## सेलेबी कंपनीची सुरक्षा मंजुरी रद्द, पाकला साथ देणे भोवले

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
पाकिस्तानसोबतचे संबंध ताणले गेलेले असताना भारत सरकारने तुर्कीला मोठा दणका दिला आहे. तुर्कीला पाकिस्तानला साथ देणे भोवले असून, याच कारणावरून भारताने देशातील प्रमुख विमानतळांवर ग्राऊंड हँडलिंग सेवा देणारी तुर्की कंपनी सेलेबीची सुरक्षा मंजुरी तात्काळ रद्द केली. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे ब्युरो ऑफ एव्हिएशन सिक्युरिटीने म्हटले आहे. याबद्दलचा अधिकृत आदेश आज जारी करण्यात आला.

भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या लष्करी संघर्षादरम्यान तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या कारवाईवरही तुर्की सरकारने टीका केली होती. एवढेच नव्हे, तर पाकिस्तानी सैन्याने भारताविरोधात कारवाया करताना तुर्कीच्या ड्रोन्सचाच वापर केला होता. यामुळे भारत आणि तुर्कीमधील संबंधात पुन्हा एकदा कटुता निर्माण झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानला



जाहीर समर्थन देणाऱ्या तुर्कीच्या कंपनीला आता भारताकडून झटका देण्यात आला.

नागरी विमान सुरक्षा ब्युरोने यासंदर्भात एक आदेश जारी केला असून, त्यानुसार सेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला विमानतळांवर ग्राऊंड हँडलिंग सेवा देण्यासाठी दिलेली मंजुरी तात्काळ रद्द केली. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी ग्राऊंड हँडलिंग एजन्सीच्या रुपात ही मंजुरी देण्यात आली होती. ही मंजुरी आता रद्द करण्यात आली आहे. नागरी उड्डाण मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या विमानतळांवर सेलेबीकडून सेवा दिल्या जात आहेत, तिथे पर्यायी ग्राऊंड हँडलिंग एजन्सींसोबत समन्वय ठेवून अंतरिम व्यवस्था केल्या जातील. लवकरच नव्या सेवा पुरवठादाराच्या नियुक्तीसाठी निविदा काढल्या जातील, असे सांगण्यात आले. सेलेबी एव्हिएशनला देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याची मागणी शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी मुख्य विमानतळ अधिकाऱ्यांकडे केली होती. याची दखल घेण्यात आली आहे.

### सेलेबी कंपनीची ९ विमानतळावर सेवा

■ सेलेबी एव्हिएशन देशातील ९ मोठ्या विमानतळांवर सेवा देते. यामध्ये दिल्ली, मुंबई, चेन्नई यांच्यासारख्या संवेदनशील विमानतळांचा समावेश आहे. ग्राऊंड हँडलिंग, कार्गो सेवा आणि एअरसाईड ऑपरेशनसारख्या सुरक्षेशी संबंधित कामांची जबाबदारी सेलेबी एव्हिएशनकडे आहे. परंतु आता सुरक्षा मंजुरी रद्द करण्यात आल्याने या कंपनीला गाळा गुंडाळावा लागणार आहे.

## मराठा आरक्षणासाठी नवे खंडपीठ स्थापन करण्याचे आदेश

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
मराठा आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याचिकांवर जलद सुनावणीसाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या पहिल्याच कामकाजाच्या दिवशी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.

सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या द्विपीठासमोर ही सुनावणी झाली. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय एससीबीसी प्रवर्गातंर्गत वैद्यकीय प्रवेशासाठी मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देण्यात आलेल्या याचिकांवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत.

या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. त्याविरोधात याचिकाकर्ते सुप्रीम कोर्टात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना मराठा आरक्षण देणाऱ्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले.

या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय कायदा, २०२४ विरुद्धच्या याचिकांवर सुनावणी करत होते.

## राज्यात १८ लाख रेशन कार्ड रद्द

● **मुंबई । वीरभूमी–**
सरकारच्या रेशनवर डल्ला मारणा–या लाखो बोगस लोकांवर डिजिटल स्ट्राईक झाला असून एकाच फटक्यात राज्यातील १८ लाख रेशन कार्ड रद्द झाले आहे. राज्यात सध्या रेशनकार्ड ई–केवायसी मोहिम राबवण्यात येत आहे.

या मोहिमेमुळे सरकारच्या अन्नधान्यावर डल्ला मारणा–या लाखो बड्या धेंडांना चांगलीच चपराक बसली आहे. गलेलठ्ठ पगार, सरकारी नोकरदार, व्यापारी, व्यावसायिक, श्रीमंतांची नावे या मोहिमेमुळे रद्दबातल होत आहे. तर बांगलादेशी नागरिकांचे पण धाबे दणाणले आहे. अनेक सरकारी अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विविध खासगी कंपन्यांतील गलेलठ्ठ पगारदार, व्यापारी, व्यावसायिकांकडे सुद्धा रेशनकार्ड आहेत. त्याआधारे दर महिन्याला ते धान्य उचलतात.

विशेष म्हणजे अनेक शहरात, गावात हे धान्य खरेदी करणारे सकाळीच 'आहे का तांदूळ, गहू, ज्वारी, दाळ?' अशी आरोळी ठोकतात. हे धान्य ते विविध गृहउद्योग, कुक्कुटपालन आणि इतर ठिकाणी विक्री करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून होतो. त्यामुळे सरकारी अन्नधान्य योजनेला लागलेली ही सुखवस्तू वाळवी पोखरत असल्याचे समोर आले. त्यानंतर आधार कार्ड सहाय्याने ई–केवायसी मोहिम राबवण्यात येत आहे. त्यात अनेक बोगस रेशनकार्डधारक समोर आले आहेत. त्यांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यांचे रेशनकार्ड रद्द करण्यात आले आहे.

## संगमनेर येथे ३८ वेठबिगार व ३१ बालकामगारांची मुक्तता

● **संगमनेर । वीरभूमी–**
संगमनेर तालुक्यातील शेंडेवाडी, साकूर, पिंपळगाव, कवटे मलकापूर व कर्जुले पठार येथील दगडखानीवर काम करणाऱ्या ३८ वेठबिगार कामगार व ३१ बालकामगारांची मुक्तता करण्यात आली. मुक्तता करण्यात आलेल्या ३८ वेठबिगार कामगारांत २२ पुरूष व १६ महिला कामगार आहेत. ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना आज सकाळी प्राप्त झालेल्या तक्रारीवर प्रशासनाने ही तत्परतेने कारवाई केली आहे.

मुक्तता करण्यात आलेले सर्व वेठबिगार व बालकामगार पालघर जिल्ह्यातील असून, तहसीलदारांच्या स्वाक्षरीने बंधमुक्तता प्रमाणपत्र देऊन पोलीस संरक्षणात त्यांना पालघर येथे रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, उपविभागीय पोलीस अधिकारी



कुणाल सोनवणे व तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली ही मुक्तता मोहीम राबविण्यात आली. सरकारी कामगार अधिकारी, सहायक पोलीस निरीक्षक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह १० ते १२ जणांच्या तीन पथकांच्या माध्यमातून ही धडक कारवाई करण्यात आली.

मुक्तता केलेल्या स्त्री, पुरुष व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाच्यावतीने त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. वेठबिगारीतून मुक्त झालेल्या कामगारांनी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

दरम्यान, ठेकेदार श्री. राठोड यांच्याविरोधात घारगाव पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी कायदा व वेठबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगर जिल्ह्यात ऊसतोड व घरकामगारांची नोंदणी विशेष शिबिरांद्वारे मोहीम राबवा

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे । शासकीय विश्रामगृहावर जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
ऊसतोड व घरकामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा व त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडावा, यासाठी जिल्ह्यात विशेष शिबिरांचे आयोजन करून मोहीमस्तरावर नोंदणी करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले आदी उपस्थित होते.

उपसभापती श्रीमती गोऱ्हे म्हणाल्या, जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना शैक्षणिक सुविधा, सामाजिक सुरक्षा योजना इत्यादींचा लाभ मिळावा, यासाठी नोंदणी शीघ्रगतीने पूर्ण करण्यात यावी. कामगारांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. कामगारांचा आरोग्य विमा व अपघात संरक्षण विमा काढण्यासाठी पुढाकार घेण्यात यावा. यासाठी प्रस्ताव तयार करून तो सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हा वार्षिक योजनेसाठी मंजूर निधीतून ३ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव असतो. या निधीचा उपयोग महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक उपाययोजनांसाठी करावा. पीडित महिलांना 'मनोधैर्य' योजनेतून मदत केली जाते. परंतु अत्याचार घडल्यास तातडीची मदत या निधीतून करण्यात यावी.

बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास गंभीरपणे व संवेदनशीलतेने व्हावा, यासाठी जिल्ह्यात बालस्नेही पोलीस ठाण्यांची आवश्यकता आहे. जिल्ह्यात पाच ठिकाणी बालस्नेही पोलीस ठाण्यांच्या उभारणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. जिल्ह्यातील भरोसा सेलचे सक्षमीकरण करावे. ज्या ठिकाणी भरोसा सेल उपलब्ध नाही, अशा ठिकाणी ऑनलाईन भरोसा सेल तातडीने कार्यान्वित करावेत. भरोसा सेलमध्ये कार्यरत असलेल्या महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर मानवी दृष्टिकोनातून सेवा देता यावी, यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. गृहभेटीद्वारे पीडित महिलांचे समुपदेशन करण्यात यावे.

अँटी रॅगिंग सेलविषयीची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, यासाठी शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांशी बैठक घेऊन संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.



अंमली पदार्थविरोधी जागृती कार्यक्रमही राबवावा. सखी सावित्री समितीसाठी एक निश्चित कार्यपद्धती आखावी. याचा लाभ अहिल्यानगर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांनाही होईल. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने 'समाधान शिबिरांचे' आयोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात अनेक धार्मिक व इतर पर्यटनस्थळे असून, त्या ठिकाणी सातत्याने पर्यटक भेट देतात. पर्यटकांच्या समस्या नोंदविण्यासाठी मदत सेवा केंद्र सुरू करण्यात यावे. यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. जिल्ह्यात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित होणाऱ्या लोकशाही दिनामध्ये महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र वेळ राखीव ठेवून तक्रारींचे निवारण करण्यात यावे.

वीज पडून होणाऱ्या मनुष्य व वित्तहानीला प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यात वीज अपघात प्रतिबंधक यंत्रणा कार्यान्वित करावी, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यातील विविध कामांची माहिती दिली.

# SPOT NEWS



## लिंगायत संघर्ष समिती महिला आघाडीच्या पाथर्डी तालुकाध्यक्षपदी रेणुका फुलशेटे

● **पाथर्डी । वीरभूमी–**

संपुर्ण महाराष्ट्रातील लिंगायत बांधवांचे शीर्ष नेतृत्व करणाऱ्या लिंगायत संघर्ष समितीच्या महिला आघाडीच्या पाथर्डी तालुकाध्यक्ष पदावर सौ.रेणुका फुलशेटे यांची निवड करण्यात आली.लिंगायत संघर्ष समितीचे राज्य समन्वयक व आर्थिक सहकार क्षेत्रातील जेष्ठ नेते काकासाहेब कोयटे, प्रदेश अध्यक्ष सुनिल रुकारी, कार्याध्यक्ष सरलाताई पाटील यांचे संमतीने अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले. या निवडीबद्दल बोलताना सौ.फुलशेटे म्हणाल्या की, ज्या महात्मा बसवेश्वरांनी भारतात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क प्रदान केला त्यांच्या कार्याची महती सर्वदूर पोचवत महिलांचे संघटन करून त्यांचा न्याय हक्कासाठी काम करण्याचा प्रयत्न करु. या निवडीबद्दल फुलशेटे यांचे लालकृष्ण पतसंस्थेचे माजी चेअरमन व लिंगायत समाजाचे ज्येष्ठनेते प्रभाकर इजारे, लिंगायत संघर्ष समितीचे पाथर्डी तालुकाध्यक्ष सचिन फुटाणे, उपाध्यक्ष सुहास शेळगावकर, गजानन तारापुरे, अभिजीत गुजर, संजीवकुमार चेलवे यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## छावा संघटनेच्या वतीने अनाम प्रेम संस्थेत संभाजी महाराज जयंती साजरी



● **नगर । वीरभूमी–**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने अनाम प्रेम संस्थेमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व फळे वाटप करण्यात आले यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे साहेब समवेत अखिल भारतीय छावा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव दत्ताभाऊ वामन, छावा संघटनेचे सुरेखाताई सांगळे, छावा संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्ष शीलाताई शिंदे, रावसाहेब काळे, वेताळ मेजर, शिवप्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष बापू ठाणगे, अर्चना परकाळे, दीपक गहिले, सुनील ठाकरे, स्वाती गहिले आदी उपस्थित होतो. वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या आठ नऊ वर्षाच्या कार्यकाळात एकूण १२० युद्ध लढली महाराजांनी सर्वच्या सर्व युद्धात विजय मिळवला असा पराक्रम करणारे संभाजी महाराज हे एकमेव युद्ध होते छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासातून युवकांनी व सर्वांनी प्रेरणा घेतली पाहिजे युवकांनी त्यांचा आदर्श समोर ठेवल्यास येणाऱ्या अडीअडचणी व समस्यांना सक्षमपणे तोंड देता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. व छावा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव दत्ताभाऊ वामन म्हणाले की, अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांची २० वर्षापासून जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी केली जाते यावर्षी देखील अनाम प्रेम संस्थेत जयंती साजरी करण्यात आली आहे व या वेळी उपस्थित सर्वांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे पराक्रम व इतिहास डोळ्यासमोर ठेवून आपले मनोगत व्यक्त केले.

# आढळगाव-जामखेड रस्ता काम अपूर्ण; खा. निलेश लंके संतप्त

**सुभान तांबोळी यांच्या उपोषणाला पाठिंबा | अतिक्रमणांबाबत कागदपत्रात फेरफार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल**

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी राष्ट्रीय महामार्गावरील आढळगाव ते जामखेड या टप्प्यावरील अपूर्ण आणि रखडलेल्या रस्त्याच्या कामामुळे संतप्त झालेले खासदार निलेश लंके यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. या प्रश्नावर निलेश लंके प्रतिष्ठान, श्रीगोंद्याचे अध्यक्ष सुभान तांबोळी यांनी १३ मेपासून आढळगाव येथे सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी (दि.१५ मे) खा. लंके आंदोलनस्थळी पोहोचले. यावेळी अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पाळली न गेल्याने त्यांनी थेट अधिकाऱ्यांवर हात उगारल्याची घटना घडली, ज्यामुळे परिसरात खळबळ उडाली.



रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातांचा सिलसिला सुरुच असून राष्ट्रीय महामार्ग ५४८ डीचे काम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र, ठेकेदार निखिल कन्स्ट्रक्शनने आढळगाव गावठाणाजवळील बसस्थानकापासून वालवडपर्यंत सुमारे ५ किलोमीटर रस्त्याचे काम अपूर्ण आणि अस्ताव्यस्त अवस्थेत ठेवले आहे. यामुळे या मार्गावर २० ते २५ जणांचा अपघातात मृत्यू झाला असून, शेकडो जण जखमी झाले आहेत. यापूर्वीही सुभान तांबोळी यांनी तीन वेळा उपोषण केले होते. प्रत्येक वेळी खा. लंके यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांनी काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आश्वासनांची पूर्तता न झाल्याने खा. लंके यांचा संताप अनावर झाला.

आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी खा. लंके यांनी राष्ट्रीय महामार्गाचे उपअभियंता अजित गायके, निखिल कन्स्ट्रक्शनचे प्रोजेक्ट मॅनेजर सदानंद शिंदे आणि कार्यकारी अभियंता संजय शेवाळे यांना आपल्या गाडीत बसवून थेट श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आणले. त्यांनी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे, प्रभारी पोलीस निरीक्षक प्रभाकर निकम आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक संपतराव कान्हेरे यांनी तणावपूर्ण वातावरणात मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

यावेळी श्रीगोंद्याचे नागरिक पोलिस ठाण्यात आल्यानंतर त्यांनी खा. लंके यांना श्रीगोंदा अतिक्रमण प्रकरणाची माहिती दिली. श्रीगोंदा शहरातील अतिक्रमणाच्या मुद्द्यावरही खा. लंके यांनी आक्रमक पवित्रा घेतला. राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी श्रीगोंदा शहरातून जात असून, अनेक इमारतींमुळे पादचारी मार्ग आणि गटारींची कामे थांबली होती. यापूर्वी प्रशासनाने अतिक्रमणविरोधी मोहीम राबवत अनेक व्यवसायांवर कारवाई केली होती. मात्र, शहरातील साडेतीन किलोमीटर रस्ता आधीच नगर परिषदेकडे हस्तांतरित झाला असून, नगर परिषदेने मूळ मालकांना बांधकाम परवाने दिले होते. याच आधारावर जागा मालकांनी न्याय मिळवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. खा. लंके यांनी याबाबत रस्त्याची रुंदी १५ मीटरऐवजी १२ मीटर ठेवण्याचे पत्र राष्ट्रीय महामार्ग प्रशासन आणि नगर परिषदेला दिले होते. मात्र, उपअभियंता अजित गायके यांनी या पत्रात फेरफार करून नगर परिषदेला पूर्ण अतिक्रमण काढण्याची विनंती केल्याचा प्रकार उघडकीस आला. यामुळे खा. लंके यांनी गायके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

यावेळी खा. निलेश लंके म्हणाले, मी जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून संताप व्यक्त केला, याचा अर्थ मी कुणावर हात उगारला नाही. येत्या सात दिवसांत हे रखडलेले काम पूर्ण झाले नाही, तर ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करू. तसेच, ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही सुरू करू.

### आंदोलनस्थळी तणाव

■ गुरुवारी दुपारी दोन वाजता खा. लंके आढळगाव येथील आंदोलनस्थळी पोहोचले. त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत थेट अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना गाडीत बसवून पोलीस ठाण्यात नेले. यावेळी त्यांनी विभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे आणि प्रभारी पोलीस निरीक्षक प्रभाकर निकम यांच्याशी सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत चर्चा केली. या घटनेमुळे तालुक्यातील खा. लंके यांचे कार्यकर्ते आणि स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्थानिकांचा आक्रोश

■ आढळगाव–जामखेड रस्त्याच्या दुरवस्थेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. अपूर्ण रस्त्यामुळे होणारे अपघात आणि जीवितहानी यामुळे नागरिकांनी खा. लंके यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. येत्या काही दिवसांत काम पूर्ण न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## जानपीर बाबा दर्गा येथील उरुस उत्साहात



● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहराच्या सरहद्दीवर असलेले व हिंदू आणि मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेला हजरत जानपीर बाबा रहमतुल्ला अलैह दर्गा येथील उरुस दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पाथर्डी पोलिस स्टेशनच्या वतीने जानपीर बाबा यांच्या दर्ग्यास फुलांची चादर अर्पण करण्यात आली.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, गुप्त वार्ताचे पोकॉ. नागेश वाघ, पोकॉ. राम सोनवणे, इजाज सय्यद, संदीप बडे, पोलीस कर्मचारी गोफणे, भाविक मधुकर आघाव, पवन आघाव, दर्गा खादीम मुबारक सय्यद, जमीर सय्यद, अशपाक शेख आदी उपस्थित होते.

यावेळी दर्ग्याचे खादीम मुबारक सय्यद यांनी प्रार्थना पठण केले. शहराच्या सरहद्दीवर असलेले जानपीर बाबांच्या दर्गा दर्शनासाठी आज दिवसभरात विविध भाविकांनी हजेरी लावली. अनेक भाविकांनी मनोभावे बाबांना गलफ, फुलांची चादर अर्पण केली. उदबत्ती ऊद जाळुन मनोभावे दर्शन घेतले. अनेक जण आज ही बाहेरगावी जाताना जानपीर बाबांचे दर्शन घेऊन पुढील प्रवासाला जातात. शहराच्या सरहद्दीवर असलेले जानपीर बाबा गावाचे रक्षक देवता म्हणून हिंदू मुस्लिम भाविक श्रद्धेने येथे नियमित दर्शनासाठी येत असतात.

उरुसानिम्मित विविध धार्मिक कार्यक्रम होऊन सायंकाळी प्रसाद वाटप करण्यात आले.

## श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर व वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**



श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंतीनिमित्त शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठान आणि शहीद जवान स्मारक समिती, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सिंदुर रक्तदान शिबिर' आणि वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. या शिबिरात ७० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी श्री छत्रपती संभाजी महाराज, सिंदुर ऑपरेशनमधील शहीद जवान आणि पहलगाम भ्याड हल्ल्यातील ठार झालेल्या नागरिकांना मानवंदना देण्यात आली.

रक्तदान शिबिर आणि वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्षा शुभांगी पोटे आणि सतीश बोरा यांच्या हस्ते झाले. यावेळी अग्नीपंख फाउंडेशनने नेपाळी रखवालदार मदन बिसुकर्मा यांना औषधोपचारासाठी १० हजार रुपयांची आर्थिक मदत प्रदान केली. वक्तृत्व स्पर्धेत २० बाल व्याख्यात्यांनी श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर चित्तथरारक विचार मांडून उपस्थितांची मने जिंकली. वक्तृत्व स्पर्धेत अंजली आढाव (कोरेगव्हाण) यांनी प्रथम, देवेंद्र ओव्हळ (प्रिपी कोलदर) यांनी द्वितीय, तर उत्कर्ष थोरात (काष्टी) यांनी तृतीय क्रमांक पटकावला. यांना प्रतिभा पाचपुते, सनराइजच्या प्राचार्या राजेश्री शिंदे आणि जिल्हा सैनिक संघटनेचे संदीप सांगळे यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून दत्ता जगताप, प्रकाश चव्हाण आणि विठ्ठल बरबडे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाला डॉ. विक्रम भोसले, अजित काकडे, एम. डी. शिंदे, सुधीर खेडकर, सतीश मखरे, शहाजी खेतमाळीस, बाळासाहेब खामकर, राहुल कोठारे, अभिषेक दंडनाइक, अमोल दंडनाइक, ड. संपत विधाते, किसन वऱ्हाडे, विजया लंके, रेश्मा रमेश दरेकर, चंद्रकांत कोंथिबीरे, रेश्मा डांगे, आयुब तांबोळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिर यशस्वीतेसाठी शंभुराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ खामकर, नवनाथ दरेकर, संतोष जाधव, विकी शिवले, गोपाळराव डांगे यांच्यासह बारामती येथील अहिल्याबाई होळकर वैद्यकीय महाविद्यालयातील सेवक आणि माजी सैनिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# तृतीयपंथी चालविणारे राज्यातील पहिलं शेळीपालन केंद्र चितळी येथे साकार!

● **शिर्डी । प्रतिनिधी–**

समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालयाकडून मिळालेल्या शासकीय मदतीच्या व सप्रेम सामाजिक संस्थेच्या पाठबळामुळे श्रीरामपूर येथील तृतीयपंथी समाजसेवा संस्थेने राहाता तालुक्यातील चितळी येथे तृतीयपंथीयांच्यावतीने चालविण्यात येणारा राज्यातील पहिला शेळीपालन प्रकल्प साकार केला आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील तृतीयपंथी समुदायाला स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी रोजगाराची नवी वाट उपलब्ध झाली आहे, अशी भावना तृतीयपंथी समाजसेवा संस्थेच्या सचिव दिशा पिंकी शेख यांनी व्यक्त केली.

तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण या योजनेंतर्गत राज्यातील पहिल्या तृतीयपंथीय शेळीपालन केंद्राचे उद्घाटन समाजकल्याण सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार व श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या हस्ते चितळी येथे पार पडलं.

यावेळी श्री. कोरगंटीवार म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे. तृतीयपंथीयांनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून शेळीपालन व्यवसायास सुरुवात केली, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. शेळीपालनासारखा पारंपरिक व उत्पन्नक्षम व्यवसाय आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवतो. या मार्गावर चालल्यामुळे तृतीयपंथीयांना आर्थिक स्थैर्याबरोबर आत्मसन्मानही मिळणार आहे.

श्री. सावंत पाटील म्हणाले, तृतीयपंथीयांच्या घरकुल व स्मशानभूमीसाठी शिरसगाव येथे तीन एकर जागा मंजूर करण्यात आली असून ती जागा लवकरच त्यांच्या नावावर केली जाणार आहे. तृतीयपंथीयांच्या पाठीशी शासन नेहमीच खंबीरपणे उभं आहे. यासाठी तृतीयपंथी समुदायाने एक पाऊल पुढे टाकून शासनासोबत काम करण्याची गरज आहे. यावेळी पंडीत वाघेरे, डॉ. प्रकाश गायकवाड, पिंकी शेख व दिशा शेख यांनीही आपली मनोगतं व्यक्त केली.

कार्यक्रमात राहत रेशम पवार, अनु नुरजहॉं शेख, सायली किरणगुरू सोनवणे यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी असलेली तृतीयपंथीय ओळखपत्रं वाटप करण्यात आली.

यावेळी श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी प्रविण सिनारे, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, राहाता गटविकास अधिकारी पंडीत वाघेरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, नायब तहसीलदार बाळासाहेब मुळे, चितळीचे सरपंच नारायणराव कदम, तृतीयपंथी समाजसेवा संस्थेच्या अध्यक्षा पिंकी शेख, उपाध्यक्ष तमन्ना शेख, सचिव दिशा शेख व सप्रेम संस्थेचे डॉ. प्रकाश गायकवाड तसेच चितळी ग्रामस्थ, तृतीयपंथीय समुदायातील लोक उपस्थित होते.



### असं आहे पशुपालन केंद्र

■ तृतीयपंथी समाजसेवा संस्थेने चितळी शिवारात तीन एकर जागा खरेदी केली असून, समाजकल्याण विभागाच्या पाच लाख रुपयांच्या शासकीय मदतीतून साधारणतः दोन हजार चौरस फूट क्षेत्रात पशुपालन शेड उभारण्यात आला आहे. सध्या या केंद्रात १६ बकऱ्यांचं पालन केलं जात आहे. पशुपालन करणाऱ्या तृतीयपंथीयांच्या निवाऱ्यासाठी शेड शेजारीच एक हजार चौरस फूट क्षेत्रात निवासस्थानाचे बांधकाम सुरू आहे. या जागेत निवासस्थान, कूपनलिका व तारेच्या कुंपणासाठी सप्रेम सामाजिक संस्थेने आर्थिक मदत केली आहे.

SPOT NEWS



## पिंपळदरी येथे अवकाळी पावसाने कुक्कुटपालन शेड जमीनदोस्त

**अकोले । वीरभूमी-**
तालुक्यातील पिंपळदरी येथे अवकाळी बिगर मोसमी पावसामुळे ढगफुटी सदृश्य परिस्थिती मुळे कुक्कुटपालन शेड चे नुकसान होऊन ८ हजार पक्षी मृत झाल्यामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. पिंपळदरी येथील एकनाथ सोपान रंधे यांची चारशे फुट कुक्कुट पालन शेड होती. अठरा हजार पक्षी असणारी शेड असून सध्या दहा हजार पक्षी शेड मध्ये होते. मंगळवारी दुपारी दोन च्या दरम्यान अचानक वादळ वारा सुटला अन जोराचा पाऊस सुरु झाला यामध्ये शेडच्या भोवतली असणारे चेरी चे झाडें शेड वर उन्माळून पडले. तसेच जोरदार सोसाट्याचा वारा अन झाडाचा बोजामुळे चारशे फुट शेड जमीनदोस्त झाली. यामध्ये दहा हजार कोंबडी चे पिल्ले होती. हे पक्षी त्याखाली दबली गेली व मृत्यूमुखी पडली आहे. यामुळे जवळपास दहा लाख रुपया पेक्षा जास्त नुकसान झाले आहे. शेतकऱ्यावर अस्मानी संकट कोसळले असून त्याला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## इसळक निंबळक विद्यालयाच्या मुख्याध्यापकाच्या वेतनाला स्थगिती

**नगर । वीरभूमी-**
इसळक निंबळक येथिल माध्यमिक विद्यालय या शाळेतील शिपाई कर्मचारी अरुण गेनु दळवी हे १९९२ पासून कार्यरत आहेत.२० फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेत काम करत असताना अचानक चक्कर आल्याने शाळेचे मुख्याध्यापक विनायक मुरलीधर मगर यांनी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. २० फेब्रुवारी २०२५ ते १७ मार्च २०२५ पर्यंत अरुण दळवी हे आजारी रजेवर होते. १७ मार्च २०२५ रोजी शाळेत दैनंदिन कामासाठी हजर झाले असता संस्थेचे अध्यक्ष नितीन भाऊसाहेब कोतकर व मुख्याध्यापक विनायक मुरलीधर मगर तसेच तत्कालीन मुख्याध्यापक बाबासाहेब कारभारी रहाटळ यानी जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने शिपाई अरुण गेणू दळवी यांना दैनिक हजेरी मस्टरवर स्वाक्षरी करून देण्यास विरोध केला होता. परंतु मा. शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली असता मुख्याध्यापक यांना दि. २७ मार्च २०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे तात्काळ हजर करून स्वाक्षरी करून देण्यास आदेशित केले होते.परंतु मुख्याध्यापक व संस्था अध्यक्ष यांनी शिक्षणाधिकारी यांच्या आदेशाला न जुमानता केराची टोपली दाखवून शिपाई अरुण दळवी यांना स्वाक्षरी करण्यास विरोध केला होता.

# संगमनेर शहरातील प्रलंबित प्रश्नांबाबत सर्वपक्षीय नागरिक आक्रमक

### १५ दिवसात मागण्या पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन । नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना शिष्टमंडळाचे निवेदन

**संगमनेर । वीरभूमी-**
महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवून अत्यंत वैभवशाली व सुरक्षित शहर म्हणून संगमनेरची राज्यात ओळख निर्माण झाली आहे. मात्र मागील ३ वर्षापासून संगमनेर नगर परिषदेवर प्रशासक असून विकास कामांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने अनेक शहरातील नागरिक अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शहरांमध्ये नागरिकांचा रोष वाढत असून तातडीने या समस्या सोडवाव्यात या मागणीसाठी काँग्रेसने निवेदन दिले असून १५ दिवसात मागण्या न सोडवण्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.



संगमनेर नगरपरिषद येथे मा. नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी विश्वासराव मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, गणेश मादास, निखिल पापडेजा, किशोर टोकसे, शैलेश कलंत्री, गजेंद्र अभंग, जीवन पंचारिया, अभय वाजे, शिद्राम दिड्डी, अरुण काका गावित्रे, मुस्ताक शेख, शेख अहमद, प्रकाश कडलक, मनोज कुमार गंगवाल, सुभाष सानप, ॲड. अशोक हजारे, सचिन खेमनर, अमित गुंजाळ, ॲड. सुहास आहेर, सुमित पवार, शशिकांत पवार, सतीश शिंदे, सुभाष दिघे, अंबादास आडेप, विशाल निळे, ललित शिंदे, सुरेश झावरे, विजय पवार, ललित शिंदे, श्रीकांत सांगळे, संतोष मुर्तडक, शब्बीरभाई बोहरी, अरुण हिरे, सौरभ उमर्जी, प्रमोद कडलग, प्रमोद गणोरे, सोमनाथ श्रीपाद, सौदामिनी कान्होरे, सुषमा भालेराव, शिवांजली गाडे, सुनीता कांदळकर आदी मान्यवर उपस्थित होते.


या निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्यापूर्वी शहरातील नाटकीनाला सह उपनद्या साफ कराव्यात, भुयारी गटारी योजनेचे काम तातडीने मार्गी लावावे, शहरातील उद्याने साफ करावीत व तेथे चालणारे अवैध धंदे व गैरवापर करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा, ज्या स्ट्रीट लाईट बंद असतील त्या तातडीने चालू कराव्यात, विजेच्या तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्या व वाढीव झाडांची कटिंग करावी, ज्या कामांच्या निविदा निघून वर्क ऑर्डर दिलेले आहेत ती कामे त्वरित चालू करावी, मोडकळीस आलेल्या इमारतींना पूर्व सूचना देऊन त्या काढून घ्याव्यात, म्हाळुंगी नदीच्या पुलाला पावसाळ्या अगोदर कठडे बसवावी, शहरातील मोकाट प्राण्यांचा बंदोबस्त करावा, शहरातील सुलभ शौचालय युरिनल स्वच्छता करावी, शहरात आणि रस्त्यांना खड्डे पडले असून ते तातडीने बुजवावे. ज्या कामांची प्रशासकीय मान्यता झाली आहे. त्या कामांची निविदा काढावी, अपूर्ण असलेली कामे परिपूर्ण करावी, जुन्या गावठाणात वापरात नसलेले लाईट पोल काढून घ्यावेत व पावसाळ्यापूर्वी पिण्याच्या पाण्याच्या टाक्या साफ कराव्यात या मागण्यांचा निवेदनात समावेश आहे

तरी नगरपालिका प्रशासनाने पुढील पंधरा दिवसात या मागण्या पूर्ण कराव्यात, तातडीने कार्यवाही करावी असे न झाल्यास काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### अपंगांचा निधी प्रलंबित

अपंगांच्या निधी प्रलंबित आहे व अपंगांची संख्या वाढत चालली असून तो प्रश्न सोडवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संगमनेर शहरात आपण सुंदर ४० गार्डन निर्माण केले आहेत. मात्र त्याची आता दुरावस्था झाली आहे. आणि गार्डन मधील लहान मुलांचे खेळण्याची साहित्य मोडकळीस आले आहे. संगमनेर शहराची स्वच्छता आणि सौंदर्य बिघडवण्याचे काम सुरू आहे ते थांबवले पाहिजे, असे सौ. दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे.

## जिजामाता सेमी इंग्लिश स्कूलची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



**पारनेर । वीरभूमी-**
पारनेर येथील आनंद मेडिकल अँड एज्यूकेशनल फौंडेशन संचलित, जिजामाता सेमी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असे यश संपादन करून चांगल्या निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

मार्च २०२५ मधे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेत कु. सानिका संतोष रेपाळे हिने ८६.४० टक्के, यश एकनाथ बोरुडे याने ८६.४० गुण मिळवून संयुक्तपणे प्रथम क्रमांक मिळवला. श्रद्धा संतोष रेपाळे ८३.४० टक्के, श्रुतिका ज्ञानदेव शिंदे ८३.२० टक्के, कार्तिकी संदीप जगताप ७९.०० टक्के, राखी दिवटे ७८.०० टक्के गुण मिळवून उत्कृष्ठ अश्या गुणाने उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक संतोष ठाणगे, नंदा चेडे, सोपान गवते, सुनंदा घुले, सारिका वाघमारे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे सचिव डॉ. सादिक राजे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रफिक सय्यद, विश्वस्त फहाद राजे यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

## आदिवासी भागातील बीएसएनएलची सेवा सुरळीत करा

**अकोले । वीरभूमी-**
अकोले तालुक्यातील आदिवासी भागात बी.एस.एन.एल कंपनीची रेंज मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले असुन सदर बीएसएनएल या शासन अंगिकृत कंपनीची सेवा तातडीने दुरुस्त करावी अन्यथा आठ दिवसांत आंदोलन करण्याचा इशारा आदिवासी विभागातील कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाद्वारे कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.



अकोले तालुक्यातील आदिवासी भागात विशेषत वारंघुशी, शिंगणवाडी, लव्हाळवाडी, उडदावणे, पांजरे, बारी, साम्रद, कोलटेंभे, मुतखेल, मुरशेत तसेच या भागातील इतरही अनेक गावांत मोबाईलची रेंज उपलब्ध नव्हती या कारणाने आणि या भागातील जनतेच्या मागणीनुसार बीएसएनएल या कंपनीने टॉवर उभारणी करुन या भागात दुरसंचार सुविधा उपलब्ध करुन दिली. परंतु याचा या भागातील जनतेला म्हणावा तसा फायदा झाला नाही याचे कारण म्हणजे टॉवर असुनही दिवसाआड टॉवर बंद पडलेला असतो. त्यामुळे कंपनीच्या कार्डधारकांना रेंज उपलब्ध होत नाही त्यामुळे असुन अडचण आणि नसुन खोळंबा अशी या विभागातील जनतेची अवस्था झाली असुन अकोले तालुक्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने याकडे लक्ष देऊन सदर यंत्रणा सुरळीत करावी, अन्यथा येत्या आठ दिवसांत अकोले येथील बीएसएनएलच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा या विभागातील जनतेच्या वतीने अनंत घाणे यांच्यासह तुकाराम खाडे, बाजीराव संगभोर, कुशाबा पोकळे, तुकाराम सारुक्ते, नंदु रगडे, दिलीप रगडे, भास्कर खाडे, मारुती खाडे, रामदास लांडगे, पांडुरंग उघडे, भवारी सह कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाद्वारे दिले आहे.

## मानवी तस्करीविरोधात एकत्र येण्याची गरज : पोलीस उपअधीक्षक गणेश उगले



**नगर । वीरभूमी -**
समाजात वेगाने वाढणारी मानवी तस्करी ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली असून, तिचा बंदोबस्त करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विभागीय पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी तस्करी व बाल न्याय अधिनियमविषयक कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी उगले बोलत होते. ही कार्यशाळा अहिल्यानगर येथील पोलीस रिक्रेशन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

पुढे उगले म्हणाले की, मानवी तस्करी रोखण्यासाठी केवळ पोलिसच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने सजग राहणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, की कोणतीही शंका आल्यास तत्काळ पोलीस प्रशासनास माहिती कळविण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यशाळेत बालकल्याण समितीचे अध्यक्ष ड. जयंत ओहळ यांनी बालकल्याण समितीची रचना व भूमिका विषद केली. जिल्हा बालसंरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांनी बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ यावरील सविस्तर माहिती दिली. विशेष बाल पोलीस पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे यांनी बालांचे लैंगिक गुन्हे संरक्षण कायदा २०१२ (पोस्को) यावर विवेचन केले. ॲड. अनुराधा येवले यांनी पिटा व पोस्को कायद्याचे सखोल विश्लेषण केले. इंटरनॅशनल जस्टीस मिशनचे गोरख जाधव यांनी मानवी तस्करी व वेठबिगार प्रकरणांची उदाहरणांसह चर्चा केली.

कार्यशाळेअखेर मानवी तस्करी व वेठबिगार मुक्तीची सामूहिक शपथ घेण्यात आली. कार्यशाळेत जिल्ह्यातील सुमारे ६० पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले. पोलीस निरीक्षक इशामोद्दीन पठाण यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी भरोसा सेलचे हेड कॉन्स्टेबल उमेश इंगोले, महिला व बालविकास दीपा आटोळे (एलएचसी), अर्चना काळे (एएचटीयू), ए. के. पवार (एलएचसी), एस. ए. सय्यद (एएचटीयू), श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे मानवी तस्करी व वेठबिगार मुक्ततेचे जिल्हा समन्वयक सिराज शेख, अंबादास गुंजाळ, राहुल साबळे, संध्या कुलकर्णी, मंगेश थोरात, मयुरी वनवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘गुरुदत्त’चे कार्य अभिमानास्पद

### डॉ. सुभाषचंद्र बाहेती । दादाजी वैशंपायन पुण्यतिथीनिमित्त किराणा वाटप



**शेवगाव । वीरभूमी-**
गोरगरिब व रंजल्या गांजलेल्यांमध्ये देव पहाणे हीच खरी ईश्वर सेवा असून, योगतज्ञ प. पू. दादाजी वैशंपायन यांना अभिप्रेत असलेले समाज सेवेचे कार्य गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून निष्ठेने व सेवाभावी वृत्तीने होत आहे. ही बाब अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुभाषचंद्र बाहेती यांनी केले.

योगतज्ञ दादाजी वैशंपायन यांच्या पुण्यतिथीनिमित पुणे येथील किमया आश्रम चॅरिटेबल ट्रस्टने शेवगाव येथे आयोजित केलेल्या सर्व रोगनिदान शिबिरात तसेच गुरुदत्त सामाजिक संस्था आयोजित शेवगाव शहर व पंचक्रोशीतील १०० गरजू व गोरगरीब कुटुंबांना सुमारे एक लाख रुपये खर्चाच्या किराणा सामान किट वाटप कार्यक्रमात डॉ. बाहेती प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

ज्येष्ठ साधक शरद वैशंपायन अध्यक्षस्थानी होते. आरोग्य शिबिरात दीडशे रुग्णांची हिमोग्लोबिन व शुगर तपासणी करुन मोफत औषधोपचार करण्यात आले. याप्रसंगी गुरुदत्त संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, डॉ. मिनीनाथ म्हस्के, डॉ. अनघा फडके, डॉ. अनुराधा लांडे, डॉ. अण्णासाहेब दिघे डॉ. राजू पाठक, राजू डमाळे व किमया आश्रम चॅरिटेबल ट्रस्टचे सेवाभावी कार्यकर्ते तसेच सौ. ललिता वैशंपायन, संजय कुलकर्णी, पी. बी. शिंदे, हनुमान जोशी, सौ. शोभा फडके, ओमप्रकाश बाहेती, लक्ष्मण काळे, प्रा. डॉ. काकासाहेब लांडे, निलेश रोकडे, महेश देशमुख, मुकुंद शेळके, गजेंद्र राजेभोसले, सुरेश घुले, सुभाष घुगे, मनेष बाहेती, योगेश रोकडे, बंडू भोर, अभय पालवे आदी उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक दिलीप फलके यांनी केले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कोपरगावमध्ये भव्य तिरंगा मशाल महारॅली

## सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व शहीद वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रॅली । ब्रह्मोस आणि एस-४०० ठरले प्रेरणेचे स्रोत

● **कोपरगाव । वीरभूमी-**

पहलगाम येथे झालेल्या हल्याचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानवर 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबविण्यात आली. या 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेत शौर्याचे दर्शन घडवून पाकिस्तानला वठणीवर आणणाऱ्या शूर भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ व या मोहिमेत शहीद झालेल्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कोपरगाव शहरात कोपरगावकरांच्या वतीने तिरंगा महारॅली काढण्यात आली.यावेळी आ.आशुतोष काळे यांनी या महारॅलीमध्ये सहभागी होत देशाचा नागरिक या नात्याने सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी भारत माता की जय,वंदे मातरम् च्या घोषणांनी कोपरगाव शहर दणाणून गेले होते.



पहलगाम येथे पर्यटकांवर करण्यात आलेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता.त्याचा बदला आपल्या भारत देशाने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवून घेतला असून भारताच्या शुर सैनिकांनी केलेल्या बलाढ्य पराक्रमाने पाकिस्तानला आपल्यापुढे गुडघे टेकावे लागले. परंतु या लढाईत आपल्या देखील काही सैनिकांना वीरमरण आले आहे. त्यामुळे शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी व वीर जवांनाना संपूर्ण भारत देश तुमच्या पाठीशी असल्याचा विश्वास देवून सर्व सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी समस्त कोपरगावकरांच्या वतीने बुधवार (दि.१४) रोजी सायंकाळी ५.०० वाजता तिरंगा महारॅली आयोजित करण्यात आली.यावेळी आ.आशुतोष काळे यांनी देखील या महारॅलीत सहभागी होवून देशाचा नागरिक या नात्याने आपले कर्तव्य बजावले.

कोपरगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी या तिरंगा महारॅलीला भरभरुन प्रतिसाद देवून या महारॅलीमध्ये सहभागी होवून देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विघ्नेश्वर मंदीरापासून सुरु झालेली ही महारॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, महात्मा गांधी स्मारक, श्रीराम मंदिर रोड, छत्रपती संभाजी महाराज स्मारक व त्यानंतर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी येवून सामूहिक राष्ट्रगीताने या महारॅलीची सांगता झाली.

● **कोपरगाव । वीरभूमी-**

भारत मातेच्या वीर सैनिकांच्या शौर्याला वंदन करण्यासाठी व त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने कोपरगाव शहरात भव्य तिरंगा मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले. समस्त देशभक्त कोपरगांवकरांच्या वतीने घेण्यात आलेल्या या उपक्रमात युवा प्रतिष्ठानचे संस्थापक युवानेते मा. विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा सेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि आकर्षक चित्ररथ तयार केले होते.

या रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले ते ब्रह्मोस क्षेपणास्त्र आणि एस-४०० संरक्षण प्रणाली यांचे प्रतिकात्मक चित्ररथ. देशाच्या संरक्षण व्यवस्थेचे सामर्थ्य दाखवणारे हे चित्ररथ संजीवनीच्या युवा सेवकांनी अत्यंत कल्पकतेने साकारले होते. यामधून देशातील युवाशक्तीची राष्ट्रनिष्ठा आणि सैन्याबद्दलचा अभिमान प्रत्ययास आला.



या रॅलीदरम्यान पेहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या नागरिकांना तसेच देशाच्या सुरक्षेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीची ज्योत नव्या पिढीत प्रज्वलित करण्यात आली.

विविध क्षेत्रातील मान्यवर, मा.सैनिक, सर्वधर्मीय, सर्वपक्षीय, सर्व स्तरातील नागरिक बंधू भगिनी, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते. या प्रसंगी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी या चित्ररथाला साकारणाऱ्या युवकांना कल्पकता दाखवून केलेला या प्रयत्नाने सर्वांना प्रेरणा मिळाली आहे असे मत व्यक्त केले. आयोजन करण्यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्वांना धन्यवाद व्यक्त केले.

कोपरगावातील नागरिकांनी या रॅलीला मन:पूर्वक प्रतिसाद दिला. रॅली दरम्यान भारत माता की जय, जय हिंद, वंदे मातरम अशा घोषणांनी शहराचा प्रत्येक कोपरा राष्ट्रप्रेमाने भारावून गेला.

# रस्ता रुंदीकरणात पुरातन वारसा वाचवा

## शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे श्रीगोंदा तहसीलदारांना निवेदन

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण-श्रीगोंदा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सध्या सुरू आहे. हा रस्ता प्राचीन राजमार्ग असल्याने त्याच्या कडेला अनेक ऐतिहासिक वास्तू आणि पुरातन वारसा आहे. मात्र, रस्ता रुंदीकरणामुळे या वारशाला धोका निर्माण झाला आहे. यामध्ये काशीबारव, भव्य हेरिटेज वृक्ष, ब्रिटिशकालीन मैलाचे दगड आणि दगडी रोलर यांचा समावेश आहे. हा वारसा सरदार महादजी शिंदे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि ब्रिटिश सरकारच्या काळातील ऐतिहासिक महत्त्वाचा आहे.या वारशाचे संवर्धन व्हावे, यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन या संस्थेने श्रीगोंदा तहसीलदार यांना निवेदन सादर केले आहे.



निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर, आमदार विक्रमसिंह पाचपुते आणि पुरातन विभाग, नाशिक यांना पाठवण्यात आली आहे. संबंधित विभाग आणि ठेकेदारांना तातडीने संरक्षणाचे आदेश द्यावेत, अशी मागणी संस्थेने केली आहे.

रस्त्याच्या कडेला असलेल्या बेलवंडी कोठार येथील काशीबारव, देऊळगाव गलांडे येथील दगडी रोलर, खांडगाव येथील महादेव मंदिर बारव, तसेच खांडगाव-मांडवगण परिसरातील ब्रिटिशकालीन मैलाचे दगड आणि हेरिटेज वृक्ष रस्ता रुंदीकरणामुळे नष्ट होण्याची भीती आहे. हा वारसा आपल्या पूर्वजांच्या वैभवशाली संस्कृतीचे प्रतीक असून, तो पुढील पिढीसाठी जतन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

श्रीगोंदा तालुक्यात महाराष्ट्र बारव मोहीम राबवली जात आहे. बेलवंडी कोठार येथील काशीबारव १७७७ साली सरदार महादजी शिंदे यांच्या घराण्यातील सगुणाबाई शिंदे यांनी त्यांच्या जाऊबाई काशीबाई यांच्या स्मरणार्थ बांधली. ही बारव शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी ५,००० रुपये खर्चून बांधण्यात आली होती. याबाबतचा शिलालेखही उपलब्ध आहे.शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन ही संस्था आपल्या पूर्वजांचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

या निवेदन सादर करताना संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे, वारसा संवर्धन समितीचे उपाध्यक्ष दिगंबर भुजबळ, सचिन भोसले आणि मारुती वागसकर उपस्थित होते. मागणी संस्थेने प्रशासनाला या पुरातन वास्तूंचे संरक्षण करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची विनंती केली आहे. हा वारसा आपल्या सांस्कृतिक इतिहासाचा अभिमान असून, तो टिकवणे हे आपले कर्तव्य आहे, असे राजेश इंगळे यांनी सांगितले.

# अमृतवाहिनी आयटीआयच्या ११७ विद्यार्थ्यांना स्टेनले ब्लॅक अँड डेकर कंपनीत नोकरी

● **संगमनेर । वीरभूमी-**

गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी असलेल्या समन्वय करारामुळे अमृतवाहिनी आयटीआय मधील ११७ विद्यार्थ्यांची अमेरिका स्थित असलेल्या स्टेनले ब्लॅक अँड डेकर लिमिटेड पुणे डिव्हिजन मध्ये मोठ्या पॅकेजवर निवड झाली असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी आयटीआय ने सातत्याने गुणवत्ता पूर्ण शिक्षणाला प्राधान्य दिले आहे.

संस्थेमध्ये नोकरी करता स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांची समन्वय करार करण्यात आला आहे यापूर्वीही टेल्को बजाज या कंपनीमध्ये अनेक विद्यार्थ्यांची मोठ्या पगारावर यावर्षी निवड झाली आहे.

त्याचप्रमाणे आज अमेरिकन स्थित असलेल्या स्टेनले ब्लॅक अँड डेकर चाकण डिव्हिजन करता फिटर मेकॅनिक मोटर व्हेईकल मेकॅनिक डिझेल इलेक्ट्रिशियन वायरमन कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या मुलाखती घेण्यात आल्या यापैकी ११७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

ही कंपनी १८० देशांमध्ये कार्यरत असून ८५० शाखा आहेत २२ मिलियन डॉलरचा टर्नओव्हर असल्याने विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी संधी आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत निसर्गरम्य सुंदर परिसर, अत्याधुनिक सुविधा आणि प्लेसमेंट साठी परिपूर्ण प्रयत्न असल्याने संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या पगारावर थेट नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात ,विश्वस्त मा. आ. डॉ सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख ,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे , प्राध्यापक व्ही.बी धुमाळ अकॅडमी डायरेक्टर डॉ जे बी गुरव, प्राचार्य विलास भाटे आदींनी अभिनंदन केले आहे.

# पाथर्डीतील जुने बसस्थानकावर साचले तळे

## प्रवाशांचे होयातत हाल । सुलभ शौचालयाचीही सुविधा नाही

● **पाथर्डी । वीरभूमी-**

येथील जुने बसस्थानकाच्या नुतनीकरणासाठी शासनाने कोट्यावधी रुपये खर्च केले आहे. प्रवाशांना साधी मुतारीची व शौचालयाची सुविधा नाही. पावसाचे पाणी साचल्याने बसस्थानकाला तळ्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे. प्रवाशांना पाण्यातुन बसमधे चढण्यासाठी जावे लागत आहे. नव्याने काम करुनही ठेकेदाराने बसस्थानकातील पाणी बाहेर जाईल अशी व्यवस्था देखील केलेली नसल्याने शासनाचे करोडो रुपये पाण्यात गेल्याची भावना प्रवाशांमध्ये आहे.



येथील जुने बसस्थानकासाठी शासनाने कोट्यावधीचा निधी गेल्या दोन वर्षापुर्वी दिलेला होता. काम पुर्ण झाले मात्र परीसरातील नागरिकांनी मुतारीच्या कामाला हरकत घेतल्याने ठेकेदाराने ते कामच केले नाही. महीला प्रवाशांना एसटीतुन उतरल्यानंतर कुठे जावे असा प्रश्न पडतो. ठेकेदाराने केलेले दाम अतिशय सुमार दर्जाचे असल्याचे प्रवाशी सांगतात. ठेकेदाराने तेथे टाकलेले पेव्हींग ब्लॉंक असे टाकले की पावसाने पाणी बसस्थानकामध्ये साचल्याने प्रवाशांना एसटीमधे चढता व उतरता येत नाही. अर्धे बसस्थानकावर पाण्याचे तळे साचलेले आहे. अजुन खरा पावसाळा सुरु व्हायचा आहे. तेव्हा तर एसटीदेखील उभी करता येईल का नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. आताच ठेकेदाराला कोट्यावधी रुपयाचे बिले दिलेली असताना आता पुन्हा दुरुस्तीसाठी निधी कोण देणार असे आहे. ठेकेदाराकडुन हे काम पुन्हा नव्याने करुन घेण्यात यावे व शौचालयाची सोय व्हावी अशी मागणी प्रवाशी संघटनेने केली आहे. एसटीने प्रवास करणारे सर्व सामान्य नागरिक आहेत.

सामान्य माणसाची बाजु कोणी घेईल का असा प्रश्न प्रवाशी विचारत आहेत. आम्ही तक्रार करु शकत नाहीत. आमचा आवाज शासनापर्यंत पोहचविण्याचे काम वृत्तपत्राने करावे असे प्रवाशांनी सांगितले. एसटीचे बसस्थानकावरील साचलेले पाणी एका बाजुने कुठेतरी गटारीमधे सोडावे व तातडीने किमान महीलांसाठी तरी शौचालय उभारावे अशी जोरदार मागणी प्रवाशांनी केली आहे.

# चापडगाव विद्यालयात दहावीतील गुणवंतांचा गौरव

● **शेवगाव । वीरभूमी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मार्च २०२५ चा निकाल जाहीर झाला असून यामध्ये चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत उज्वल निकालाची परंपरा कायम राखली.

आज शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पालकांसमवेत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, पेढा व शाळेचा स्पंदन वार्षिकअंक देऊन गौरविण्यात आले. व भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. हा कार्यक्रम प्राचार्य अरुण वावरे यांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांनी व पालक प्रतिनिधींनी संस्कार व उपक्रमशील शाळेबरोबरच ग्रामीण भाग असूनही गुणवत्तेत आघाडी असलेल्या या शाळेचे व संस्था प्रशासनाचे कौतुक व अभिनंदन करून कृतज्ञता व्यक्त केली.



चापडगाव विद्यालयात एकूण २३८ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ७३.९४% इतका लागला. सेमी माध्यमाचा ८४. ०२ % तर मराठी माध्यमाचा ४९.२७% निकाल लागला आहे. सेमी माध्यमाची विद्यार्थिनी कुमारी पातकळ आदिती संदीप हिने ९१.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. कुमारी धायतडक रेणुका दगडू हिने ९०.८० % गुण मिळवत द्वितीय तर कुमारी नेमाणे कोमल कैलास हिने ८८ % गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. मराठी माध्यमांमध्ये कुमारी पोले निकिता विलास हीने ८१. ४०% गुण मिळवत प्रथम चिरंजीव गावडे रोहित अशोक याने ७७.४० % गुण मिळवत द्वितीय तर कुमारी सुरासे साक्षी बाबासाहेब हीने ६७.८०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधरजी काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंहभैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य अरुण वावरे, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, पालक कैलास नेमाने, संदीप पातकळ माता पालक मंगल धायतडक व ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.